**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना तिमोर लेस्तेचा 'ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्ते' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान

- अधिक उत्पादन देणाऱ्या आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ

- कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ सालाकरता प्रति हेक्टर पाच हजार रुपये अर्थसहाय्य दिलं जाणार असल्याची कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

- माजी परराष्ट्रमंत्री के. नटवरसिंग यांचं दीर्घ आजारानं निधन

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप, एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह पदक तालिकेत भारत ७१ व्या स्थानी, भारताचा नेमबाज अभिनव बिंद्रा याला प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर पुरस्कार प्रदान

**<><><><><>**

फिजी, न्यूझीलंड आणि तिमोर लेस्ते या तीन देशांचा दौरा आटोपून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नवी दिल्लीला रवाना झाल्या आहेत. अंतिम टप्प्यावर, राष्ट्रपतींनी तिमोर लेस्तेला भेट दिली. तिथे त्यांना देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कार, असलेल्या 'ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्ते' या पुरस्कारानं सन्मानित केलं गेलं.

राष्ट्रपतींनी काल तिमोर लेस्तेची राजधानी 'डिली' इथं तिमोर-लेस्तेचे राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांनी परस्पर सहकार्यासाठी तीन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या.

दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना तिमोर लेस्तेच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित केलं जाणं हा देशासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे. अनेक वर्षांच्या सार्वजनिक जीवनातल्या मुर्मू यांच्या अतुलनीय योगदानाची ही एक ओळख असल्याचं मोदी यांनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या कृषी विज्ञान केंद्रात अधिक उत्पादन देणाऱ्या, आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ केला. यात २७ बागायती पिकं आणि ३४ नगदी पिकं आहेत. यात भरडधान्य, तेलबिया, कडधान्य, ऊस, कपाशी, तृणधान्य यांसह भाज्या, फळं, कंदमुळं, मसाले, औषधी वनस्पती, फुलं अशा विविध पिकांचा समावेश आहे. यावेळी त्यांनी शेतकरी आणि कृषी वैज्ञानिकांशी संवाद साधला. नव्यानं विकसित होणाऱ्या नव्या वाणांच्या फायद्यांबद्दल कृषी विज्ञान केंद्रांनी शेतकऱ्यांना माहिती द्यावी, अशी सूचना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. ही नवी वाणं तयार केल्याबद्दल त्यांनी शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं. लोक आता पोषक आहारावर भर देत असल्याचं सांगून भरड धान्याचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

ही नवी वाणं खर्च कमी करणारी, तसंच पर्यावरणस्नेही असल्यानं अतिशय फायद्याची असल्याचं मत केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी यावेळी व्यक्त केलं. शेतकऱ्यांनीही सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारनं उचललेल्या पावलांबद्दल, तसंच याबाबत जागरुकता निर्माण करण्यात कृषी विज्ञान केंद्रांनी बजावलेल्या भूमिकेबद्दल समाधान व्यक्त केलं.

<><><><><>

सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनी अमेरिकेतल्या हिंडेनबर्ग या गुंतवणूक आणि संशोधन संस्थेनं केलेले आरोप फेटाळले आहेत. बुच दांपत्याचा अदानी समुहाशी संबंधित ऑफ-शोअर संस्थांमध्ये सहभाग असल्याचा आरोप हिंडनबर्गनं केला होता. यासंदर्भात धवल बुच यांनी एक निवेदन जारी केलं असून, आपल्या उत्पनाविषयीची माहिती सार्वजनिक असल्याचं म्हटलं आहे. यासंदर्भातली आवश्यक कागदपत्र याआधीच सेबीकडे जमा करण्यात आली असल्याचं त्या निवेदनात म्हटलं आहे. आपल्या आर्थिक कागदपत्रांसह इतर दस्तऐवजांची चौकशी करण्याला हरकत नसल्याचंही त्यांनी निवेदनातून स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नीट पदव्यूत्तर प्रवेश परीक्षा आज होत आहे. नॅशनल मेडिकल सायन्स एक्झामिनेशन बोर्ड दोन सत्रांमध्ये ही परीक्षा घेणार आहे. सुमारे दोन लाखांहून अधिक विद्यार्थी प्रवेश परीक्षेला बसले आहेत. जूनमध्ये परीक्षेच्या नियोजित तारखेच्या एक दिवस आधी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. स्पर्धा परीक्षांवर झालेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला होता.

<><><><><>

वक्फ दुरुस्ती विधेयक, २०२४ चं पुनरावलोकन करण्यासाठी स्थापन केलेली ‘जेपीसी’ अर्थात, संयुक्त संसदीय समिती, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवशी लोकसभेला आपला अहवाल सादर करेल, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी काल सोशल मीडियावरील संभाषणादरम्यान, दिली. या प्रकरणाच्या सुनावणीची तारीख ही संसदीय समिती जाहीर करेल, मुस्लिमांसह, सकारात्मक योगदान देऊ इच्छिणाऱ्या

कोणत्याही संस्था किंवा व्यक्तींला या समितीच्या कामकाज प्रक्रियेत सहभागी होता येईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ सालाकरता प्रति हेक्टर पाच हजार रुपये अर्थसहाय्य द्यायची शासनाची योजना आहे. त्याकरता पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या आधार आणि बँक खात्याशी संलग्न असलेल्या माहितीचा वापर करू देण्यासंदर्भातलं त्यांचं वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत पत्र आपल्या कृषी सहाय्यकाकडे जमा करणं आवश्यक आहे, असं कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे.

२०२३ च्या खरीप हंगामामध्ये कापूस आणि सोयाबीनचे कमी दर मिळाल्यानं शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक नुकसानीवर उपाययोजना म्हणून राज्य शासनानं अशा पात्र शेतकऱ्यांना दोन हेक्टर पर्यंत मदत द्यायचा निर्णय घेतला आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पेऱ्यांची नोंदणी केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेता आदिनाथ कोठारे यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड--बाईट - आदिनाथ कोठारे ( २० सेकंद)**

**<><><><><>**

माजी परराष्ट्र मंत्री के. नटवर सिंग यांचं काल रात्री दिल्लीजवळच्या गुरुग्राममध्ये दीर्घ आजारानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. काही काळ त्यांची तब्येत बरी नव्हती. नटवर सिंह यांचा जन्म १९३१ मध्ये राजस्थानच्या भरतपूर जिल्ह्यात झाला. १९८४ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. नटवर सिंग यांनी अनेक पुस्तकंही लिहिली आहेत.

माजी परराष्ट्र मंत्री नटवर सिंग यांच्या निधनाबद्दल उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. परराष्ट्र धोरण आणि जागतिक मुत्सद्देगिरीमध्ये सिंग यांनी भरीव योगदान दिल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा समारोप आज होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता हा समारोपाचा समारंभ सुरू होईल. दोन ऑलिम्पिक पदकं जिंकणारी नेमबाज मनू भाकर आणि हॉकी संघाचा गोलकीपर पी. आर. श्रीजेश या कार्यक्रमात भारताचे ध्वजधारक असतील. समारोपाच्या वेळी ऑलिम्पिक ज्योत समारंभपूर्वक शांत केली जाईल आणि पुढच्या, २०२८ ऑलिम्पिकच्या लॉस अँजेलिस व्यवस्थापन समितीकडे ऑलिम्पिकचा ध्वज सुपूर्द केला जाईल. सध्याच्या पदकतालिकेत भारत एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह ७१व्या स्थानावर आहे. चीन पहिल्या, अमेरिका दुसऱ्या, तर ऑस्ट्रेलिया तिसऱ्या स्थानावर आहे.

दरम्यान, भारतासाठी पहिलंवहिलं वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारा नेमबाज अभिनव बिंद्रा याला काल आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या कार्यक्रमात प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट हिला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाविरोधात तिनं दाखल केलेल्या याचिकेवर निकाल द्यायला ऑलिम्पिक क्रीडा लवादचा निकाल १३ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

पंढरपूर इथं सर्व सुविधायुक्त राज्यातलं पहिलं १ हजार खाटांचं सामान्य रूग्णालय उभारण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय जारी केला असल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

नवनिर्मित १ हजार खाटांच्या या रूग्णालयात सामान्य रूग्णालय ३०० खाटा, महिला व शिशु रूग्णालय ३०० खाटा, ऑर्थोपेडिक आणि ट्रामा केअर रूग्णालय १५० खाटा, सर्जरी रूग्णालय १०० खाटा, मेडिसीन अतिदक्षता रूग्णालय १०० खाटा, आणि मनोरूग्णालय ५० खाटा अशी रचना असणार आहे. यासाठी जागा उपलब्ध करून बांधकाम आणि पदनिर्मितीची स्वतंत्रपणे कार्यवाही केली जाईल, असे निर्णयात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

नाशिकमधला महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचा प्रकल्प परराज्यात गेल्याचं  वृत्त काही ठिकाणी प्रसिद्ध झालं होतं; मात्र त्यात काही तथ्य नाही असं खुद्द कंपनीनंच शेअर बाजाराला पत्र पाठवून स्पष्ट केलं असल्याची माहिती. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. ते काल रत्नागिरीत बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा अद्याप ठरलेला नसून विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणूनच जनतेसमोर जाणार असल्याचं  काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं  आहे. ते काल लातूरमध्ये बातमीदारांशी बोलत होते.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ ऑगस्ट २०२४ - रविवार

**<><><><><>**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गट शिवसेनेच्या ठाणे जिल्हा महिला प्रमुख अनिता बिर्जे यांनी काल आनंद आश्रम इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आपण राजकारणासाठी नाही तर समाजसेवेसाठी शिवसेनेत प्रवेश करत असल्याचं बिर्जे यांनी प्रवेशानंतर बातमीदारांना सांगितलं.

**//<><><><><>//**